-

# फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ११५/२०२४ मधील नि.१ खालील आदेश

**( कामधेनु गोरक्षण सेवाभावी संस्था विरुध्द महाराष्ट्र शासन )**

प्रस्तुतचा अर्ज हा कामधेनु गोरक्षण सेवाभावी संस्था यांनी कलम ५०३ भा.ना.सु.सं.२०२३ अन्वये ३ बैलांचा अंतरीम ताबा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जदार संस्था ही दि.२४.१०.२०२४ रोजी अर्ज दाखल झालेपासुन गैरहजर असुन त्यांनी अर्जात कोणतेही तजबीज केलेली नाही. आज रोजी अर्जदार यांची वारंवार पुकारा करून देखील गैरहजर आहे. अर्जदारातर्फे प्रकरण तहकुबीचा अर्ज नाही. प्रकरण दि. २०.०३.२०२५ रोजी खारीज आदेशासाठी ठेवण्यात आले. तरी ब–याच तारखांपासून अर्जदार व त्यांचे विधीज्ञ गैरहजर. यावरून असे दिसून येते की, अर्जदार ही प्रस्तूतचे प्रकरण चालवू इच्छीत नाही. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

फौ.कि.अर्ज क्र. ११५/२०२४ हे प्रकरण अर्जदाराने पुर्तता न केल्यामुळे काढुन टाकण्यात येते.

Digitally signed by SABALE SHITAL DATTATRAY
Date: 2026.03.14 16:24:25 +0530

औसा. (एस. डी. साबळे)

दिनांकः– १३/०३/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, औसा.